## MAHARASHTRA ACT No. V OF 1963.

## THE MAHARASHTRA PROVISIONAL COLLECTION OF TAXES ACT, 1962.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमति दिनांक ११ जानेवारी १९६३ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT NO. V OF 1963.

## AN ACT TO PROVIDE FOR IMMEDIATE EFFECT BEING GIVEN, FOR A LIMITED PERIOD, TO PROVISIONS IN BILLS RELATING TO THE IMPOSITION OR INCREASE OF TAXES.

## सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

[राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर, "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक १६ जानेवारी १९६३ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला].

**कर बसविण्यासंबंधीं किंवा वाढविण्यासंबंधीं विधेयकांतील उपबंध मर्यादित मुदतीपुरते ताबडतोब अंमलांत आणण्यासाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, कर बसविण्यासंबंधीं किंवा वाढविण्यासंबंधीं विधेयकांतील उपबंध मर्यादित मुदतीपुरते ताबडतोब अंमलांत आणण्यासाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. ह्या अधिनियमास महाराष्ट्राचा तात्पुरते कर वसूल करण्याबाबत अधिनियम, १९६२, असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणें आवश्यक नसेल तर, ह्या अधिनियमांत— व्याख्या.

(१) "जाहीर केलेला उपबंध" या शब्दप्रयोगाचा अर्थ, कलम ३ अन्वयें ज्याबाबत जाहीरनामा दाखल करण्यांत आला आहे असा विधेयकांतील उपबंध, असा समजावा ;

(२) "कर" या संज्ञेंत कोणतीहि पट्टी, उपकर (सेस), शुल्क (ड्यूटी), फी, दस्तुरी (टोल) किंवा इतर कर यांचा समावेश होतो, मग ते सर्वसाधारण असोत किंवा स्थानिक किंवा विशेष असोत.

३. जेव्हां राज्य सरकारच्या वतीनें महाराष्ट्र विधानसभेंत आणावयाच्या विधेयकांत एखादा कर बसविण्याबाबत किंवा तो वाढविण्याबाबत तरतूद करण्यांत आली असेल तेव्हां, असा कर बसविण्यासंबंधीं किंवा वाढविण्यासंबंधीं विधेयकांतील कोणत्याहि उपबंधाची या अधिनियमान्वयें ताबडतोब अंमलबजावणी होणें हें लोकांच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट आहे असा जाहीरनामा विधेयकांत दाखल करून घेण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे. ह्या अधिनियमान्वयें जाहीरनामा दाखल करण्याचा अधिकार.

अधि- ४. (१) जाहीर केलेला उपबंध ज्या विधेयकांत असेल तें विधेयक ज्या दिवशीं मांडण्यांत
न्वयें येईल किंवा राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत येईल त्या दिवशीं, या दोहोंपैकीं जो दिवस आधींचा असेल त्या
क- दिवशीं, अशा जाहीर केलेल्या उपबंधास संध्याकाळीं ५ (प्रमाणवेळ) वाजल्यापासून विधीसारखा
ा अंमल प्राप्त होईल.
र-
चा (२) जाहीर केलेल्या उपबंधाचा ह्या अधिनियमाच्या उपबंधांन्वयें विधीसारखा अंमल असण्याचें
ास व पुढील परिस्थितींत बंद होईल—
मुदत. (अ) जेव्हां असा उपबंध त्यांत सुधारणा होऊन किंवा सुधारणा न होतां अधिनियम म्हणून अंमलांत येईल तेव्हां, अथवा

(ब) जेव्हां राज्य सरकार, महाराष्ट्र विधानसभेनें संमत केलेल्या प्रस्तावानुसार, अशा उपबंधांचा विधिसारखा अंमल असण्याचें बंद होईल असा निदेश राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें देईल तेव्हां, अथवा

(क) जर कंडिका (अ) किंवा कंडिका (ब) अन्वयें अशा उपबंधाचा विधीसारखा अंमल असण्याचें आधींच बंद झालें नसेल तर, जाहीर केलेल्या उपबंधास ज्या दिवशीं पोट-कलम (१) अन्वयें विधीसारखा अंमल प्राप्त झाला असेल त्या दिवसानंतर साठावा दिवस संपेल तेव्हां.

र- ५. (१) कलम ४, पोट-कलम (१) अन्वयें विधीसारखा अंमल प्राप्त झाल्यानंतर साठावा
चा दिवस संपण्यापूर्वीं जेव्हां असा जाहीर केलेला उपबंध सुधारलेल्या स्वरूपांत अधिनियम म्हणून
बंद अंमलांत येईल तेव्हां, अशा अधिनियमांत दाखल केलेला उपबंध हा जाहीर कलेला उपबंध
वर असता तर जे कर वसूल करण्यांत आले नसते ते वसूल केलेले सर्व कर परत करण्यांत आले
रकमा पाहिजेत :
रणें.

परंतु, ज्या दरानें कोणताहि कर या पोट-कलमान्वयें परत करण्याचा अधिकार आहे तो दर, जाहीर केलेल्या उपबंधांत सुचविलेल्या अशा कराचा दर व कलम ४, पोट-कलम (१) अन्वयें ज्या दिवशीं जाहीर केलेल्या उपबंधास विधीसारखा अंमल प्राप्त झाला त्या दिवसाच्या निकट-पूर्वी अंमलांत असलेला दर यांच्यामधील तफावतीपेक्षां अधिक असतां कामा नये.

(२) जेव्हां जाहीर केलेल्या उपबंधाचा कलम ४, पोट-कलम (२), कंडिका (ब) किंवा कंडिका (क) अन्वयें विधीसारखा अंमल असण्याचें बंद होईल तेव्हां, त्यासंबंधीं जाहीर-नामा दाखल करण्यांत आला नसता तर जे कर वसूल करण्यांत आले नसते असे वसूल केलेले सर्व कर परत करण्यांत आले पाहिजेत.

९३८चा ६. मुंबईचा तात्पुरते कर वसूल करण्याबाबत अधिनियम, १९३८, हा याद्वारें रद्द करण्यांत येत आहे.
ियम
४ रद्द

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.